साहित्य प्रतिष्ठान

# कवडसे



ई-साहित्य प्रतिष्ठान

अंक – १०१ वा,

<u>अतिथी संपादक</u>

आल्हाद महाबळ (मुंबई)

<u>यजमान संपादक</u>

सोनाली घाटपांडे (पुणे)

<u>संपादक मंडळ</u>

भारती सरमळकर (मुंबई)

स्वप्ना कोल्हे (नाशिक)

सचिन काकडे (मुंबई)

शशिकांत रणवरे (ठाणे)

सारंग भणगे (पुणे)

ई-बुक्स विनामूल्य मिळण्यासाठी तसेच सूचना,अभिप्राय,प्रतिक्रियांसाठी संपर्क करा
esahity@gmail.com
नेटाक्षरीचा हा विनामूल्य अंक नियमित मिळण्यासाठी व सूचना,अभिप्राय,प्रतिक्रियांसाठी संपर्क करा
netaksharee@gmail.com
ई साहित्य प्रतिष्ठानची आजवरची १३६ प्रकाशने सीडीवर उपलब्ध आहेत.
" शतकोत्सव : ५० रुपयांत १३६ पुस्तके"
संपर्क - **९८६९६७४८२०**

अंकातील सर्व कवितांचे हक्क कविंच्या स्वाधीन. अंकाचे सर्व हक्क ई-साहित्य प्रतिष्ठानचे स्वाधीन



## अतिथी संपादक : आल्हाद महाबळ

“मूर्ती लहान पण किर्ती महान” ही उक्ती आल्हादच्या बाबतीत अगदी तंतोतंत खरी ठरते. धडपड्या , सतत नाविन्याची आवड असणारा आल्हाद हृदयाने कवी आहे आणि मनाने photographer. तसेच त्याला प्रवासाचीही खूप आवड आहे. सतत भटकणे, photography मध्ये वेगवेगळे experiments करणे हा बहुदा त्याचा स्थायीभाव असावा. अशाच अनेक भटकंतीमध्ये त्याला जाणवलेल्या काही गोष्टी त्याने शब्दबध्द केल्या आहेत.

शहर म्हटलं की काय येतं डोळ्यासमोर? हव्या त्या सगळ्या सुविधा, सुखसोई की गर्दी, गडबड, गोंधळ, प्रदूषण? खेड्यातल्या लोकांना शहराचं आकर्षण आणि शहरी लोकांना खेड्याचं... परवा एकदा बसलो होतो मरीन ड्राईव्हवर, तर एक पितापुत्रांची जोडी येऊन उभी राहीली बाजूला. बहुतेक शिक्षणासाठी मुंबईत राहाणारा तो मुलगा वडिलांना मुंबई दाखवत होता. क्वीन्स नेकलेस, ओबेरॉय ट्रायडेन्ट, दूर दिसणारे ब्रेबॉर्नचे दिवे, गिरगाव चौपाटी वगैरे वगैरे. बहुधा पहिल्यांदाच मुंबई फिरायला बाहेर पडलेल्या त्या पित्याला शाळेच्या पुस्तकात पाहिलेला अरबी समुद्र आपण प्रत्यक्ष पाहतोय ह्यावर विश्वासच बसत नव्हता. त्याने मुलगा बरोबर आहे की नाही ह्याची माझ्याकडून खात्रीसुद्धा करून घेतली. मुलानं मग अतिरेकी हल्ला झालेलं ट्रायडेन्ट ते हेच असं म्हटल्यावर त्या पित्यानं परत एकदा आजूबाजूला कोणी नाही ना ते हळूच पाहून घेतलं. मला एक जुनाच प्रसंग आठवला. फेसबुक नवं होतं आणि फार्मव्हिले न खेळणारा तो आदिवासी अशी समजूत अगदी भरात असण्याचा तो काळ. आम्ही हुरडा पार्टीला गेलो होतो. आणि माझा एक भाचा शेत पाहून ओरडला, 'फार्मव्हिल' म्हणून. आणि मग तो जेमतेम एकरभर शेताचा मालक शेतकरी त्याला जगातला सर्वात श्रीमंत माणूस वाटत होता...

असो. खेड्यातलं जगणं, तिथला संघर्ष याचं भलंबुरं चित्रण आजवर कथा कादंबऱ्या, सिनेमांतून झालंच आहे. पण शहराचं काय? शहरी जगणं कसं असतं? आमचं तुमचं? त्यांचं? श्रीमंतांचं? गरीबांचं? निव्वळ शहरात राहण्याच्या म्हणून अडी अडचणींचा सामना करावा लागतो त्याचं काय? अभिषेक बच्चनचा ब्लफमास्टर असो की करण जोहरचा कोणताही चित्रपट असो, श्रीमंत आयुष्य फॅंटसाईझ करायला शिकवतो. आपल्या रोजच्या जगण्याची बातच नसते. असे क्षणिक विसरलेले स्ट्रगल्स पिक्चर सुटल्यावर गर्दीत परत आपल्या मानगुटीवर बसणारच असतात. ह्या शहरी जगण्यातले हव्यास, आनंद, दु:ख, तडजोडी, गैरसोई तपासून पहायला हा नेटाक्षरीचा अंक.

धन्यवाद.
आल्हाद

# एका सुजलेल्या शहरात...

एका सुजलेल्या शहरात
दुःख फिरतंय बाईकवरून रंपाट
प्रयत्नांचे सिग्नल तोडत
नशीबाला साथीला घेत
धूळभरल्या हवेत
अश्रू झालेत चिकार
एका सुजलेल्या शहरात
दुःख फिरतंय बाईकवरून रंपाट
एका सुजलेल्या शहरात
फ्ल्यायओव्हरचं काम
मूठभर कारवाल्यांसाठी
आयुष्याचं दाम
पिलर एखादा तुटू दे
इन्शुरन्स क्लेम मिळू दे
पांढऱ्याशुभ्र झब्ब्याखाली
फक्त मन नसू दे भिकार

एका सुजलेल्या शहरात
दुःख फिरतंय बाईकवरून रंपाट
परफ्यूम शिंपडून निघालो
घामाचा झाकायला वास
फुटलाच कुठे बॉम्ब तर
रक्ताचं करू काय
सुजट शहरावर धुळीचा लेप
धुळीच्या लेपावर दुःखाची भेग
जाणून बुजून आता
निर्ढावत जातोय खास
एका सुजलेल्या शहरात
दुःख फिरतंय बाईकवरून रंपाट
एका सुजलेल्या शहरात
दुःख फिरतंय बाईकवरून रंपाट

**आल्हाद महाबळ**

# कर्फ्यू

आज शहरात कर्फ्यू आहे, तंग तरीपण परिस्थिती नियंत्रणात आहे
गोळीबारात तीन, सुरामारीत पाच असा सगळा हिशोब आहे
नाही समक्ष नाही पाहिलं पण ही टिव्ही न्यूज आहे
आज शहरात कर्फ्यू आहे

आधी हे असं नव्हतं, आमचं शहर शांत होतं
सगळे व्यवहार, सारं कसं शांत होतं
परवाच नाही का आमच्या समोरचे
काय बरं नाव त्यांचं?
त्यांच्या सुनेने स्वतःला जाळून घेतलं?
आमचं दार, त्यांचं दार आमनेसामने
पण पेपरात आलं तेव्हा समजल
असं सगळं चाललं होतं , आमचं शहर शांत होतं

आज शहरात कर्फ्यू आहे, वाहतूक व्यवहार बंद आहे
पलिकडच्या गल्लीत मारामारी होऊन , वातावरण म्हणे  तंग आहे
नाही समक्ष नाही पाहिलं, पण ही टिव्ही न्यूज आहे
आज शहरात कर्फ्यू आहे

आधी हे असं नव्हतं आमचं शहर शांत होतं
मागच्याच महिन्यात आमचा फ्रेंड, ब्रीजचा पार्टनर
त्याचा मुलगा, तरणाठा बापाशी भांडला अन पळून गेला
जानी दोस्त हो आमचा रोजची बैठक ब्रीजची आमची
पण पेपरात आलं तेव्हा कळलं असं सगळं चाललं होतं
आमचं शहर शांत होतं आज शहरात कर्फ्यू आहे

जाळपोळ लुटालूट म्हणे चालू आहे
नाही समक्ष नाही पाहिलं पण ही टिव्ही न्यूज आहे
आज शहरात कर्फ्यू आहे

आधी हे असं नव्हतं आमचं शहर शांत होतं
कालच नाही का समोरच्या रस्त्यावर
जीपने उडवला एकाला पडला तळमळत, रस्त्यातच
आपण नाही पडलो, नसत्या कटकटीत
गेला म्हणे जागीच पण पेपरात आलं, तेव्हा समजलं
असं सगळ चाललं होतं आमचं शहर शांत होतं

आज शहरात कर्फ्यू आहे पण सहा ते दहा ढिल आहे
दरम्यान शांतीयात्रेचा म्हणे प्रोग्राम आहे?
नाही, आपण नाही त्यात अहो, दाढी आंघोळ व्हायची आहे
या आता तुम्ही पण कारण दहा तर
आज शहरात कर्फ्यू आहे

**- डॉ. अशोक कुलकर्णी**

# मुंबई मेरी जान

मुंबईकर उठतात लवकर का ते ?
बॉसचा ओरडा खावा लागेलम्हणून....
पळतात का ? तर आज तरी विंडो सिट मिळेल ..

कामाचा बोजा अंगावर घेत घ्यावा लागतो ..... नाही ......
आज तरी वरकमाई होईल
आणि मग दुनियाला शिव्या शाप घालीत..निघतात....
मग सूर्य ही हळूच दिवसातून काढता पाय घेतो
आणि मग एकदाचा दिवस मावळतो
आणि मग काय .. खरी मुंबई !!

पण इथे रात्रीचा दिवस होतो ...
पण इथे ....मुंबई जेवढं देते तेवढं घेते पण .....

परत दूसरा दिवस ..
पळायला सुरुवात ...पळण्याच्या शर्यतीत
एकदा मागे वळून पाहून ..
मागच्याचा वेग ...
आपल्या पेक्षा जास्त नाही ना ?
ते पाहून इथे वेग घ्यावा लागतो ...
वेग !! ना..........
वाघाच्या पूढे हरीणाचा जेवढा असतो ना !!

तेवढा...बस्स अंगी वाघाची चपळाई बाळगा...
हे करत ...................
मुंबई मेरी जान ..............

**- रविंद्र भांगे**

# मनातला गाव माझ्या

मनातला गाव माझ्या, अजूनही तसाच आहे
तळातला भाव भोळा, अजूनही तसाच आहे
.
पावसाळे आले गेले, लाल पाणी वाहते झाले
राईतला वास ओला, अजूनही तसाच आहे
.
नागमोडी वळणे रस्ते, घाट तो सुटला मागे
देहातला ताल मेणा, अजूनही तसाच आहे
.
झाडीतला रान मेवा, खाऊंनी मन तृप्त झाले
ओठातला तो गोडवा, अजूनही तसाच आहे
.
हातातला हात माझ्या, चढणीत आगे मागे
खेळातला साव मेळा, अजूनही तसाच आहे
.
निखळसे ते रंग सारे, श्रावणी फुलली फुले
आठवातला बाल ठेवा, अजूनही तसाच आहे
.
मनातला गाव माझ्या, अजूनही तसाच आहे
.
.

**स्वाती फडणीस**

# एक गाव होते........

एक गाव होते........

एक जग होते,  जगात एक गाव होते
जणू निराळेच जग, एक प्रेमाची बाग

बागेत माणसे होती, माणसात प्रेम होते
प्रेमात होते नहात
होताना गावाची पहाट

हळू हळू मध्यान्ह झाली
माणसे उन्हाने पोळू लागली
एकदुसऱ्याची छत्री ओढून
आपल्या डोक्यावर सावली पकडू लागली

बघता बघता प्रेमात
त्वेश चढला अंगात
आजी आजोबा मरण पावले
तरुणतुर्क कारभारी झाले

अन संध्याकाळी, भकास गावात
कुत्री भुंकू लागली
म्युन्सिपाल्टीच्या दिव्याखाली
गाव चोरटेपणे कुडकुडत शांत मेले

आणि मृतप्राय गावाच्या , विच्छिन्न छाताडावर
कोवळे शहर झिंगुन नाचत होते
नाचत होते

**अनुराग कौशिक**

# कवडसे

मावळत्या सुर्यासंगे

तरळून आठवण गेली

ओल्या गावाची छबी

वाहत डोळ्यात आली ||

उघडी लाकडाची वखार

फळ्यांची उभी शीग

पोरके कुत्र्याचे पिल्लू

काढे दुधाचा माग ||

अंधार दाटल्या देवळात

भणभणे दगडी दिवा

नदीपलीकडल्या घाणेरीत


उडे एकटा काजवा ||

अंगणी शिंपल्या सड्याचा

एक वेगळाच सुवास

रांगोळीतल्या हळदीकुंकवासवे

घश्यात अडकतो श्वास ||



परसदारी थापल्या शेणी

बंबात जळते जळण

सरळ चालल्या वाटेने

रानात घेतले वळण ||

विटाळ भीतीने अंगणी

भिजुनी झिजला पत्थर

देवघरात जळते निरंजन

मनात उठवते काहुर ||

बदलत्या चित्रातले रंग

आता झालेत धुसरसे

भिंतीवरी खोवल्या आरशीचे

आता दचकवतात कवडसे ||

**विजयकुमार**

# चिमण्या

शहरात हल्ली
चिमण्याच दिसत नाहीत
अंगणात दाणे टिपणाऱ्या

शहरात हल्ली
अंगणंच दिसत नाहीत
फुलझाडांनी नटलेली

शहरात हल्ली
फुलझाडंच दिसत नाहीत
फुलांनी डंवरलेली

==============

शहरात हल्ली
फुलं मात्र खुप दिसतात
विकायला आलेली.

**नाम गुम जायेगा**

# बोनसाय

ना चिमण्या ना फुल
ना माणस ना मुल
कदाचित सगळ्याच
झालेल बोनसाय
डवरतात फक्त
प्लॅस्टीकची फुल

ना बोर ना चिंचा
ना उस ना आंबा
अंगण लोपलय
लोपलय घरपण
सा-याची घाई
जगायच दडपण

ना गोट्या ना सोंगट्या
ना विटीदांडू ना आट्यापाट्या
विकायला काढ्लाय
सारा गाव
म्हणतोय मुंबईचा
करावा शांघाय

- **सोनाली घाटपांडे**

# टेररिस्ट

बाजारात भाजी घेत होतो
क्या चाचा सब खैरियत है?
भाजिवाल्याने समोरच्च्या माणसाला विचारले
हा बेटे असे म्हणत तो निघून गेला
अचानक माझी नजर एका टिफिन बॉक्सवर पडली

हे बघा काय आहे? मी ओरडलो
रहीम चाचा सोडून गेलेत, भाजिवाल्याची प्रतिक्रिया
माझ्या भोवती लोकांचा जमाव वाढत गेला
टिफिन बॉम्ब असणार

ह्या लोकांचा काही भरवसा नाही
गद्दार साले, तिकडे जावून का नाही राहत ?
संताप,अफवांचे बॉम्ब फुटत होते
गर्दीचे पालकत्व घेऊन मी लोकाना शांत करत होतो

एवढ्यात रहीम चाचा तेथे आले
गर्दी बघून काय झाले असेल याचा त्याना अंदाज आला
पोते के लिए खिरखुर्मा ले जा रहा था
लेकिन टिफिन यही भूल गया

टिफिन बॉक्स उघडा करून दाखवत ते पुटपुटले
साब दाढ़ी बढ़ानेवाला हर आदमी टेररिस्ट नहीं होता .
RDX विना आमचे encounter करत ते निघून गेले

**- मिलिंद**

# माझा गाव

माझ्या गावात गावात
अत्तराचा ग पाऊस
माझ्या गावच्या मातीला
चंदनाचा ग सुवास

माझ्या गावच्या गंगेला
धरते ग जणू साय
घेते कुशीत सर्वांना
पान्हा फुटलेली माय

माझ्या गावात फुलती
अन्नधान्याची शिवारं-
घरा घरात पूजती
शिवाजी राजांची तलवार

माझ्या गावात रे प्यावी
पेला भरून काकवी
अन डोळे पुसत पुसत
इथे मिसळ चाखावी

माझ्या गावाचा ग साज
रस्सा पांढरा तांबडा
अन माझ्या गावच्या डोईचा
ताज पन्हाळा रांगडा

माझ्या गावच्या मर्दानी
फड कुस्तीचा लढवावा
लावणी दणाणून शिट्ट्यांनी
पटका त्यांनीच उडवावा

माझ्या गावाला ग राखी
जणू भगवान शंकर
नदी शेजारी वसती
प्रभू दत्त दिगंबर

बाप गावाचा ग रहातो
देव जोतीबा डोंगराला
आई अंबाबाईची किरपा
अशी लाभू दे सर्वाला

**अभिषेक प्रभुदेसाई .**

# लोकल

लोकलच्या किंचीतसा आत आणि बाहेर लटकता माणूस

जेव्हा  आभाळगर्द इमल्यांकडे बघतो

तेव्हा थोडा हबकतो, जरा थबकतो

त्याच्या वीतभर घराची किल्ली खिशातच चाचपता आणि
पुटपुटतो

“आहे किल्ली आहे ” ।।

लोकलच्या घट्ट आत आणि सैलसा बाहेर लटकता माणूस

जेव्हा सेकंदभर लेडीज डब्ब्यांसमोरुन भरधाव धावतो

तेव्हा  थोडा ओशाळतो, नजरा टाळतो

भरधावलेल्या डब्यातल्या लटकत्या ‘ती’च्या भोवती ताटकळतो

आणि  लाजतो  “हे हे हे” ।।

लोकलच्या नावाला आत आणि हवेला बाहेर लटकता माणूस

जेव्हा धावत येणा-यांना हाताने धरून जागा देतो

तेव्हा  थोडा सरकतो जरा चेंबटतो

आणि नंतर अमराठी भाषेचे धडे गिरवतो

“काय हे? चलो ठिक है?”

लोकलच्या चपळतेने आत आणि खुबीने बाहेर लटकता माणूस

जेव्हा एखाद्या भणंग बाजा वाजवत लंगडणा-याला बघतो

तेव्हा थोडा पाणावतो , त्याला खुणावतो

खिशात हात खिसा थोडा खोल खोल जाणवतो

आणि  विचारतो “कुठलं गाणं रे हे?”

लोकलच्या बरयापैकी आत आणि डोकावण्यासाठी बाहेर लटकता माणूस

जेव्हा आत खिडकीत डुलत्या पेंगलेल्यांकडे बघतो

तेव्हा थोडा थकतो जरा टेकतो

डाव्या खांद्यावरची बॅग उजवीकडे घेत मग पायही बदलतो

आणि गुणगुणतो “जिंदगी प्यार का गीत है” ।।

लोकलच्या अवघडलेला आत आणि सवयीने बाहेर लटकता माणूस

जेव्हा खिडकीजवळची रिकामी जागा बघतो

तेव्हा थोडा सुस्कारतो , बसायचे ठरवतो

सवय नको म्हणत रिकामी जागा बघत तसाच

लटकतो आणि बडबडतो

शेवटचंच स्टेशन हे

शेवटचंच स्टेशन हे

**प्राजक्त देशमुख**

मराठी रसिकांना नेहमी उत्तमोत्तम आणि नवनवीन साहित्य पुरवण्याचा ई साहित्य प्रतिष्ठानचा ध्यास नेटाक्षरी जोमाने पार पाडत आहे. दर वेळी येणाऱ्या तुमच्या प्रतिसादांनी आमचा उत्साह उधाणतोच. याच प्रोत्साहनाच्या बळावर आपण शतक गाठले आणि पुढला प्रवास अधिक जोशाने होत जाईल. नेटाक्षरी हा साप्ताहिक अंक सध्या सुमारे ८५००० मराठी रसिकांना विनामूल्य वितरित केला जातो. या व्यतिरिक्त जुने अंक पहाण्यासाठी www.esahity.com या वेबसाईटवर व्हिजिटणाऱ्यांची संख्याही लक्षणीय आहे. हे अंक आपण आपल्या ईष्ट मित्रांना फ़ॉरवर्ड करून त्यांनाही या आनंदयात्रेत सहभागी करून घ्यावे. त्याच मेलची cc आम्हाला (netaksharee@gmail.com} दिल्यास आम्ही पुढचे अंक त्यांना विनामूल्य पाठवत राहू. मराठीची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत जाण्यात आपलाही हातभार लागावा असे कोणाला नाही वाटणार ? आपल्यासारख्या रसिकांच्या सहाय्याने नेटाक्षरी लवकरच लाखाचा पल्ला पार करील हा विश्वास आहे.

## ई साहित्य प्रतिष्ठानची इतर प्रकाशने

विनोदाचा दादा : ई स्टाप
कवितांचा आवाज : स्वरनेटाक्षरी अल्बम
मुलांचा नेट प्रवेश : बालनेटाक्षरी
महाराष्ट्राचं वैभव : दुर्ग दुर्गट भारी

**ई पुस्तके :**

ओथंब,

मोरया,

चार क्षण,

सईची वही

लोकल गोष्टी

प्रियेचे अभंग

तो आणि ती,

टल्लीची शाळा

अहम् ब्रह्मास्मि

ग्रेव्हयार्ड लिटरेचर

मकरंदच्या त्रिवेण्या

मीरा (मराठी अनुवाद)

सावळ्या मुलीची गाणी,

देशी दारूचे दुकान (3D),

मराठी कसे लिहावे(ई शाळा),

नेटाक्षरीच्या भावी थीम्स : घुंगरांच्या तालावर (लावणी),

संपर्क : - ९८६९६७४८२०

अधिक माहितीसाठी भेट द्या : www.esahity.com